**पंतप्रधानांची भूतानला भेट (11-12 नोव्हेंबर 2025)**

08 नोव्हेंबर 2025

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी 11-12 नोव्हेंबर 2025 दरम्यान भूतानला औपचारिक भेट देतील. ही भेट दोन्ही देशांमधील मैत्री आणि सहकार्याच्या विशेष संबंधांना अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने असून, नियमित द्विपक्षीय उच्च-स्तरीय देवाणघेवाणीच्या परंपरेला अनुसरून आहे.

2. या भेटीदरम्यान, पंतप्रधान भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचूक यांची भेट घेतील आणि दोन्ही नेते भारत सरकार आणि भूतानच्या शाही सरकारने संयुक्तपणे विकसित केलेल्या 1020 मेगावॅट पुनात्सांगचु-II जलविद्युत प्रकल्पाचे उद्घाटन करतील. पंतप्रधान भूतानचे चौथे राजे, महामहिम जिग्मे सिंगे वांगचूकच्या 70व्या जयंतीनिमित्त समर्पित समारंभात उपस्थित राहतील. पंतप्रधान भूतानचे पंतप्रधान महामहिम श्री. शेरिंग तोबगे यांचीही भेट घेतील.

3. पंतप्रधानांची ही भेट भारतातून आणलेल्या भगवान बुद्धांच्या पवित्र पिप्रहवा अवशेषांच्या प्रदर्शनाच्या अनुषंगाने आहे. पंतप्रधान थिम्फू येथील ताशिचोझोंग येथे पवित्र अवशेषांना अभिवादन करून प्रार्थना करतील तसेच भूतान सरकारद्वारे आयोजित जागतिक शांतता प्रार्थना महोत्सवातही सहभागी होतील.

4. भारत आणि भूतान यांच्यात सखोल परस्पर विश्वास, सद्भावना आणि एकमेकांप्रती आदर यावर आधारित एक अद्वितीय आणि आदर्श भागीदारी आहे. सामायिक आध्यात्मिक वारसा आणि जनतेमधील परस्पर प्रेमळ संबंध हे या विशेष भागीदारीचे वैशिष्ट्य आहेत. पंतप्रधानांची ही भेट उभय बाजूंना आपली द्विपक्षीय भागीदारी अधिक वृद्धिंगत आणि बळकट करण्याच्या मार्गांवर विचारविनिमय करण्याची तसेच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि व्यापक विषयांवर मतांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध करून देईल.

नवी दिल्ली

08 नोव्हेंबर 2025